(सोबत मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली " सन २०१७-१८ ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि सन २०१८-१९ गळीत हंगामाचे धोरण ठरविणे " या विषयाबाबत दि.२५/०९/२०१८ रोजी मा.मुख्यमंत्री यांचे समिती कक्ष, मंत्रालय, मुंबई येथे पार पडलेल्या मा.मंत्री समितीच्या बैठकीचे इतिवृत्त)

क्रमांक- ससाका २०१८/प्र.क्र.१४९/२५ स
सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ३२
दि.२०.११.२०१८

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित,

(प्रमोद वळंज)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**प्रति,**

मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई
मा.मंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.राज्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (सहकार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (राज्य उत्पादन शुल्क), गृह विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (उर्जा), उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव (ला.क्षे.वि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
अध्यक्ष/ उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., साखर भवन, नरीमन पॉईंट, मुंबई
महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी, पुणे
चेअरमन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई
अध्यक्ष, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ०५
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., साखर भवन, नरीमन पॉईंट, मुंबई

२. यांना विनंती करण्यात येते की, साखर संघातील संबंधितांना आपल्या स्तरावरून इतिवृत्ताची प्रत पाठविण्यात यावी.

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या., मुंबई
साखर आयुक्त (आमंत्रक, मंत्री समिती), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे

२. बैठकीतील निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात यावे.

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी-**
कार्यासन अधिकारी (का.३ स/२५ स), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

**मंत्री समिती बैठक**

**मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली " सन २०१७-१८ ऊस गाळप हंगामाचा आढावा आणि सन २०१८-१९ गळीत हंगामाचे धोरण ठरविणे " साठी दि.२५/०९/२०१८ रोजी पार पडलेल्या मा.मंत्री समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

| विषय | मुद्दा | मा.मंत्री समितीचे निर्णय | निर्णयाची अंमलबजावणी करणारी यंत्रणा / अधिकारी | अमलबजावणी पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ च्या मा.मंत्री समितीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | इतिवृत्त सर्व सदस्यांना वितरीत केले व ते कायम केले आणि इतिवृत्ताप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. | साखर आयुक्त | कार्यवाही प्रलंबित नाही. |
| २ | गाळप हंगाम सन २०१८-१९ सुरु करणे. | गाळप हंगाम सन २०१८-१९ सुरु करण्याच्या दिनांकाबाबत बैठकीत उपस्थित झालेल्या मुद्दांबाबत चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.<br>१) गाळप हंगाम दि. २० ऑक्टोबर, २०१८ पासून सुरु करावा.<br>२) ऊसाचे संपूर्ण गाळप होईपर्यंत गाळप परवाना देण्यात यावा.<br>३) गाळप परवाना ऑनलाईन पध्दतीने देण्यात यावा. | १. साखर आयुक्त<br>२. साखर आयुक्त<br>३. साखर आयुक्त | १. १५ दिवस<br>२.गाळप हंगाम २०१८-१९<br>३.गाळप हंगाम २०१८-१९ |
| ३ | ऊसाची उपलब्धता व गाळपाचे नियोजन | या बाबत साखर आयुक्त यांचेमार्फत आढावा घेऊन नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. | साखर आयुक्त | १ महिना |
| ४ | ऊस बिलातील कपाती व ठेवी बाबत. | एफआरपी ची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केल्यानंतर खालीलप्रमाणे कपाती करण्यास मान्यता देण्यात आली.<br>१)मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रति मे टन रु.४/- प्रमाणे.<br>२)वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट निधी रु. १/- प्रति क्विंटल साखर उत्पादन. | १)साखर आयुक्त<br>२) साखर आयुक्त/ वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट. | १)गाळप हंगाम २०१८-१९<br>२)गाळप हंगाम २०१८-१९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३)महाराष्ट्र राज्य सह.साखर कारखाना संघ वर्गणी :-<br>१. उत्पादनातील कारखान्यांना रु.१/- प्रति क्विंटल.<br>२. भाडे/भागिदारी तत्वावरील कारखाने ७० पैसे प्रति क्विंटल.<br>३. अत्यल्प उत्पादन / अनुत्पादित कारखाने रु.१५०००/- | ३)साखर आयुक्त/ महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ | ३)गाळप हंगाम २०१८-१९ |
| | | ४) शासन निर्णयास अधिन राहून भाग विकास निधी ऊसदराच्या कमाल ३% किंवा रु.५०/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढ्या मर्यादेपर्यन्त कपात. | ४) साखर आयुक्त / साखर कारखाने | ४) गाळप हंगाम २०१८-१९ |
| | | ५) साखर संकुल देखभाल व दुरूस्ती करीता प्रतिटन ५० पैसे/- प्रमाणे कपात. | ५) साखर आयुक्त / साखर कारखाने | ५) गाळप हंगाम २०१८-१९ |
| | | ६) प्रस्तावित कै.गोपिनाथ मुंडे ऊस तोडणी कामगार कल्याणकारी महामंडळासाठी प्रति मे.टन रु.१/- प्रमाणे कपात.<br>**वरीलप्रमाणे कपातीबाबत साखर आयुक्त, पुणे यांनी तपासून कार्यवाही करावी.** | ६) साखर आयुक्त / साखर कारखाने | ६) गाळप हंगाम २०१८-१९ |
| ५ | गाळप हंगाम २०१८-१९ मध्ये साखर कारखाना स्तरावर कपात करावयाचा निधी. | एफआरपी ची संपूर्ण रक्कम शेतकऱ्यांना अदा केल्यानंतर खालीलप्रमाणे ठेवी स्विकारण्यास मान्यता देण्यात आली.<br>अ) नवीन प्रकल्पाकरीता वित्तीय संस्थांच्या कर्जाऐवजी नवीन ठेवी स्विकारणे.<br>➢ शेतकऱ्यांना द्यावयाच्या FRP मधून कोणतीही कपात करण्यात येणार नाही.<br>➢ जुन्या ठेवी मुदतीत परत करणे आवश्यक<br>➢ ठेवीचे नियम तयार करावे<br>➢ सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता<br>➢ ठेवीदाराने मुदतपूर्व ठेवीची मागणी केल्यास परतफेड बंधनकारक | अ )साखर आयुक्त / साखर कारखाने | अ) गाळप हंगाम २०१८-१९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ब) नविन प्रकल्पाकरिता ऊस बिलातून यापूर्वी कपात केलेल्या ठेवीस मुदतवाढ देणे.<br>➢ ठेवीवर पूर्णत: व मुदतीत व्याज दिलेले असावे<br>➢ ठेवीची मुदत प्रकल्प अहवालात दर्शविलेल्या मुदतीपेक्षा जास्त नसावी<br>➢ मुदतवाढीकरिता सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक.<br>➢ मुदतवाढीसाठी साखर आयुक्तालयाची मान्यता आवश्यक.<br>**वरीलप्रमाणे कपातीबाबत साखर आयुक्त, पुणे यांनी तपासून कार्यवाही करावी.** | ब ) साखर आयुक्त / साखर कारखाने | ब) गाळप हंगाम २०१८-१९ |
| ६ | शासकीय येणेबाकीच्या वसूली बाबत | शासकीय भागभांडवल, कर्ज व हमीशुल्क वसूलीसाठी टॅगिंगद्वारे प्रतिपोते रु.२५/- प्रमाणे कपातीचे धोरण हंगाम २०१८-१९ मध्ये सुरु ठेवणेबाबत निर्णय झाला. | साखर आयुक्त / साखर कारखाने | गाळप हंगाम २०१८-१९ |
| ७ | कामगारांची थकीत देणीबाबत | कामगारांची थकीत देणी भागविण्यासाठी साखर विक्रीतून रु.५०/- प्रति क्विंटल कपात. | साखर आयुक्त / साखर कारखाने | गाळप हंगाम २०१८-१९ |
| ८ | **मा.अध्यक्ष महोदय यांच्या मान्यतेने आयत्या वेळचे विषय** | | | |
| | साखर संघ व विस्माच्या शिफारशीबाबत | साखर संघ आणि विस्मा यांनी दिलेल्या निवेदनातील मुद्दे मा.मंत्री समिती समोर सादर करण्यात आले व त्याबाबत सविस्तर चर्चा झाली. (निवेदने सोबत जोडली आहेत) | - | -- |
| ९ | महसुल उत्पन्न विभागणी सूत्र (RSF) बाबत नियमातील ७० : ३० / ७५ : २५ च्या तरतुदीमध्ये सुधारणा करणे | सदरची बाब ऊस नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेत येत असल्याने पुढील कार्यवाही ऊस नियंत्रण मंडळामार्फत करण्यात येईल. | साखर आयुक्त तथा सदस्य सचिव, ऊस नियंत्रण मंडळ | गाळप हंगाम २०१८-१९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | स्वनिर्मित वीज स्वत:च्या वापरासाठी कारखान्यांना रु.१.२० प्रति युनिट विद्युत शुल्क द्यावे लागते. सदर शुल्क रद्द करण्यात यावे. | कारखाना स्वत: वीज निर्मिती करून स्वत:च्या कारखान्यासाठीच वापर करत असल्यामुळे उर्जा विभागाने रु.१.२० प्रति युनिट विद्युत शुल्क रद्द करण्याबाबत विस्मा आणि साखर संघाने केलेल्या मागणीबाबत ऊर्जा विभागाने योग्यती कार्यवाही करावी. | ऊर्जा विभाग / साखर संघ / विस्मा | गाळप हंगाम २०१८-१९ |
| ११ | साखरेचा किमान दर हा रु.२९/- प्रति किलो ऐवजी रु.३५/-प्रति किलो निश्चित करणेबाबत | साखरेचा किमान दर हा रु.२९/- प्रति किलो ऐवजी रु.३५/- प्रति किलो निश्चित करणेबाबत केंद्र शासनाच्या खाद्यान्न मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे शिफारस करण्यात येईल. | साखर आयुक्त / प्रधान सचिव ,सहकार विभाग | गाळप हंगाम २०१८-१९ |
| १२ | गाळप परवाना देतांना गाळप क्षमतेपेक्षा जास्त २५ % पर्यंत गाळप करण्यास कारखान्यास परवानगी देणे. | गाळप परवाना देताना क्षमतेपेक्षा २५% तफावत मान्य करण्याची विनंती विस्माने केली. याबाबत पर्यावरण विभागाच्या सर्व निकषांची कारखाना पूर्तता करत असेल तर त्यांचेविरुद्ध कार्यवाही होणार नाही. | पर्यावरण विभाग / महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळ | गाळप हंगाम २०१८-१९ |
| १३ | Rectified Sprit / Extra Neutral Alcohol (ENA) यांच्या टाक्यांमध्ये BHeavy Molasses मधील इथेनॉल साठविण्याची परवानगी देण्यात यावी. | याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभागाने कार्यवाही करावी. | सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग | १ महिने |
| १४ | साखर निर्यात अनुदान २०१४-१५ व सॉफ्ट लोन २०१५ व्याजाची रक्कम खाजगी साखर कारखान्यांना देण्याबाबत | यासंदर्भात विस्मा यांचेकडून खाजगी साखर कारखान्यांना अनुदान देण्याबाबत न्यायालयीन निर्णयाची प्रत सादर केल्यानंतर त्याबाबत तपासून निर्णय घेण्यात येईल. | विस्मा/ साखर आयुक्त/ सहकार विभाग | गाळप हंगाम २०१८-१९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | इथेनॉल निर्मितीबाबत केंद्र शासनाने जाहीर केलेल्या धोरणांतर्गत राज्य शासनाचे इथेनॉल धोरण तयार करण्याबाबत. | प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क यांचे पातळीवर राज्य शासनाचे इथेनॉल धोरण (Ease of doing business) तयार करून शासनास मान्यतेसाठी सादर करावे. | प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क विभाग | १ महिना |

************************************************************

६५


# वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन(एन.जी.ओ.)

तळमजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे–४११ ००५.

ईमल आय डी –ed@wisma.in / ajitchougule123@gmail.com

**Website : www.wisma.in**

Mobile. No:- 077 57 02 19 53/ 099 22 71 43 84 .

GSTIN / UIN : 27AAATW3526H1ZE


---

**संदर्भ : विस्मा/मंत्री समिती/५८/२०१८–१९ दिनांक–४ सप्टेंबर, २०१८.**

**प्रति,**

**माननीय साखर आयुक्त,**

महाराष्ट्र राज्य,

साखर संकुल, शिवाजीनगर,

पुणे–४११ ००५.

**विषय – सन २०१७–१८ मधील ऊस गाळपाचा आढावा आणि सन २०१८–१९ मधील ऊस गाळप हंगामाचे धोरण ठरविण्यासाठी मा. मंत्री समितीच्या बैठकीच्या** चर्चेतील विषयावर अभिप्राय देणेबाबत.

**संदर्भ – आपले पत्र कं. साआ/कक्ष–७/२१४१/ अर्थ–१/मं.स. बैठक/२३४/ २०१८ दिनांक २१/०७/२०१८ चे पत्र.**

मान्यवर महोदय,

राज्यातील साखर हंगाम २०१७–१८ मधील ऊस गाळपाचा आढावा आणि हंगाम २०१८–१९ मधील ऊस गाळपाचे धोरण ठरविणेबाबत मा. मंत्री समितीच्या बैठकीसाठी आपण कळविलेल्या मुद्यांवर आमचा अभिप्राय खालीलप्रमाणे देत आहोत.

**१) साखर कारखाना गळित हंगाम सुरू करण्याबाबत धोरण :–**

हंगाम २०१८–१९ मध्ये ऊसाची उपलब्धता मोठया प्रमाणावर असल्यामुळे हंगाम १ ऑक्टोबर–२०१८ पासून चालू करण्यास्तव परवानगी देण्यात यावी.

२) ऊसाची उपलब्धता :–

हंगाम २०१८–१९ मध्ये ऊसाचे क्षेत्र ११.६२ लाख हेक्टर, गाळपाकरीता उपलब्ध ऊस ९५० लाख टन, उतारा ११.३० प्रमाणे साखर निर्मिती १०७ लाख टन हा आयुक्तालयाचा अंदाज योग्य वाटतो.

३) ऊसाला वाजवी व किफायतशीर दर (FRP) देणे बाबत :–

हंगाम २०१८–१९ करीता केंद्र शासनाने १८ जुलै २०१८ रोजी एफआरपीमध्ये २० रू. प्रती क्विंटल वाढ करून १० टक्के उताऱ्याकरीता २७५ रू. प्रती क्विंटल व प्रती ०.१ उताऱ्याकरीता २.७५ पैसे प्रमाणे राज्याची सरासरी एफआरपी सुमारे रू. २७८६/– प्रती टन होईल. अधिक उतारा असणाऱ्या जिल्हयांकरीता रू. ३४३०/– पर्यंत जाईल. ऑगस्ट–२०१८ मधील कारखाानास्तरावरील जीएसटी कर वगळून सरासरी साखर दर हे ३००० च्या खाली राहिले आहेत. ऑगस्ट २०१७ ते मे २०१८ पर्यंत साखरेचे दर हे उत्पादन खर्चापेक्षा कमी निच्चांकी पातळीवर ३५०० पासून ते २५०० रू. पर्यंत खाली आले होते. त्यामुळे बहुतांशी कारखान्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत खालावली आहे व त्यामुळे ते अत्यंत आर्थिक संकटात सापडले आहेत. राज्य, राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील साखर उत्पादन व साठा यांचा विचार करता हे दर वाढण्याची शक्यता कमी आहे.

3) अ) <u>साखरेचा किमान हमी भाव</u>–पुढील हंगामामध्ये FRP देणेसाठी किमान साखर किंमत दर हा उत्पादन खर्चा एवढा म्हणजे किमान रू.३५००/– प्रति क्विंटल मिळणे आवश्यक आहे. चालु हंगामातील साखरेचा किमान हमी दर रू.२९००/– हा उत्पादन खर्चा पेक्षा जवळपास रू.४००/– नी कमी असल्याने FRP ची फार मोठी रक्कम थकीत आहे.

ब) <u>FRP ची रक्कम ३ हप्त्यांमध्ये अदा करणेसाठी कायद्यात बदल</u> –शुगर केन कंट्रोल ऑर्डर नुसार FRP ची रक्कम एक रक्कमी १४ दिवसांमध्ये देणे बंधनकारक असल्याने व उत्पादीत साखर मासिक कोठयानुसार विक्री करावी लागत असल्याने साखर माल तारण कर्जावर एक रक्कमी FRP देणे अशक्य आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील पूर्वीचे पद्धती प्रमाणे व गुजरात मधील सध्याचे पद्धती प्रमाणे देणे व्यवहार्य राहील.

१) प्रथम हप्ता ऊस आले नंतर १४ दिवसांमध्ये FRP च्या ५० टक्के.
२) द्वितीय हप्ता हंगाम सुरू झाल्याच्या ३ महिन्या नंतर FRP च्या २५ टक्के. (एकूण –७५ टक्के)
३) तृतीय हप्ता हंगाम बंद झाले नंतर ३० जून चे आत अंतीम FRP प्रमाणे.

४) **उपपदार्थांबाबत धोरण (मळी, इथेनॉल, सहवीजनिर्मिती, व इतर उपउत्पादने):–**

- मळीवरील वाहतूक शुल्क – मळीवरील वाहतूक परवाना शुल्क रू. १ प्रती टनावरून प्रती टन ५०० रू. केली आहे. ती अवाजवी असून ती रद्द करावी. यामुळे राज्यातील मळीच्या दरावर प्रतीकूल परिणाम झाला आहे.

- इथेनॉल खरेदी दर २०१८–१९ हंगामाकरीता केंद्र शासनाच्या धोरणानुसार तेल कंपन्यांनी खरेदीची किंमत रू. ४७.१३ पै. प्रती लिटर ही बी हेवी मोलॅसिस/ ऊसाच्या रसापासून उत्पादीत केलेल्या करीता केली आहे. सध्याच्या मळी व अल्कोहोलचे दर व मागणी विचारात घेतली असता मळीपासुनच्या इथेनॉलचे दर हे ५२ रू. व बी हेवी मोलॅसिसपासुनचे उत्पादन दर ५७ रू. करणे आवश्यक आहे. याबध्दल व फक्त बी हेवी मोलॅसिस पासुन इथेनॉल उत्पादन करणे अनिवार्य करावे. अशी शिफारस राज्य शासनाने केंद्रास करावी. यामुळे साखर उत्पादन कमी होवून साखरेचे बाजारातील दर सुधारतील.

  सध्याची साखरेची शाश्वत विक्रीची किंमत रू. २९ वरून ३५ रू. करणे आवश्यक आहे, जी उत्पादन खर्चाशी सुसंगत अशी राहिल.

- रेक्टीफाईड स्पिरीट – रेक्टीफाईट स्पिरीट वर २० टक्के लावलेला व्हॅट कर हा जीएसटीच्या प्रणालीनुसार अधिक असुन तो रद्द होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारच्या २२/८/२०१७ च्या परिपत्रकानुसार राज्यातील रेक्टीफाईड स्पिरीट व ईएनए चा वापर देशी व विदेशी मद्यार्काकरीता वापरल्यास २० टक्के व्हॅट आकारणी होते. ती जीएसटी प्रणालीखाली १८ टक्के करावी.

- **सहवीजनिर्मिती –**

  अ) सहवीजनिर्मिती प्रकल्पाकडून स्ववापरावर आकारण्यात येणारे विद्युत शुल्क रू. १.२० प्रती युनिट ही साखर कारखान्यांची हालाखीची आर्थिक परिस्थिती पाहता रद्द करणे आवश्यक आहे.

  ब) सहवीजनिर्मितीकरीता (बॉयलर बसविणे) कारखान्यांना ऊस खरेदी करामध्ये सुट दिली होती. जीएसटीमुळे ऊस खरेदीकर आता अस्तित्वात नाही. म्हणून ऊस खरेदी कराच्या १० वर्ष सुट मर्यादेच्या सवलतीची उर्वरीत कालावधीची सुट रक्कमेइतकी मा. मुख्यमंत्री निधीमध्ये सुट मिळावी अथवा उर्वरीत सवलतीची रक्कम कारखान्यांना परत मिळावी. (संदर्भ –हंगाम २०१७–१८ मंत्री समिती बैठक दिनांक २०/९/२०१७ चे इतिवृत्त मुद्या क्रं. ७ भाग –३.)

- **वीज खरेदी दर** – राज्यातील नवीन सहवीजनिर्मिती प्रकल्पांमध्ये उत्पादीत होणारी वीज जुन्या दराने खरेदी करावी. तसेच ज्या कारखान्यांचे करार पूर्ण झाले आहेत त्या करारांचे नुतनीकरण पूर्वीच्याच दराने करावे.
- **इ रिव्हर्स बिडींग रद्द करावे–** राज्यातील सहवीजनिर्मिती प्रकल्पामधील निर्माण होणारी वीज खरेदीसाठी महावितरण चे इ रिव्हर्स बिडींगचे धोरण जाचक व कायदयाशी सुसंगत नसल्याने ते रद्द करावे.
- **सौर उर्जा उत्पादन** – ज्या कारखान्याकडे सहवीजनिर्मिती प्रकल्प आहेत अशा प्रकल्पांनासुध्दा सौर उर्जा उत्पादन करण्यास व नेट मिटरींगची मान्यता दयावी. यामुळे कारखान्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल.
- **प्रदुषण नियंत्रण मंडळाची कन्सेंट** – राज्यातील इथेनॉल उत्पादकांना निवीदा भरतेवेळी इथेनॉल उत्पादन परवाना व प्रदुषण नियंत्रण मंडळाचे "कन्सेंट टू ऑपरेट" घ्यावे लागते. परंतु या परवानगीस ६/७ महिन्यांपर्यंतचा कालावधी लागत असल्याने इथेनॉल निविदा रद्द होवू शकतात. याकरीता प्रदुषण नियंत्रण मंडळाने 'कन्सेंट टू ऑपरेट' परवाना ३० दिवसांमध्ये दयावा.

## ५) साखर कारखान्यांकडे शिल्लक साखर साठा/उपपदार्थ मुल्यांकन :–

**साखर कारखान्यांकडे शिल्लक साखर साठयाचे मुल्यांकन** :–अकौंटींग स्टँडर्ड (AS-2) या आंतरराष्ट्रीय अकौंटींग प्रणालीनुसार तसेच आयकर कायद्यातील तरतुदीनुसार वर्ष अखेरीस साखर साठयाचे मुल्यांकन हे चालू बाजारभाव अथवा उत्पादन खर्च यापैकी जो कमी असेल त्या दराने करण्याचा नियम आहे व या नियमानुसारच खाजगी साखर उद्योगातील साखर साठयांचे मुल्यांकन केले जाते. त्यामुळे सहकारी कारखान्यांचेसुध्दा मुल्यांकन वरील नियमानुसारच होणे आवश्यक आहे, तरच योग्य मुल्यांकन होवून त्यावर्षातील आर्थिक परिस्थितीचे वास्तव चित्र उपलब्ध होईल व खाजगी तसेच सहकारी कारखान्यांच्या हिशोब पत्रकात तफावत राहणार नाही.

## ६) साखर निर्यात धोरण :–

भारत सरकारने साखर हंगाम २०१७–१८ मध्ये गाळप केलेल्या ऊसाची किंमत अदा करण्याकरीता रू. ५.५० प्रती क्विंटल अनुदान जाहीर केले आहे. ते अपूरे असून हंगाम २०१८–१९ मध्ये राज्यातील ऊसाचे अधिक उपलब्धता व साखर उत्पादन पाहता हंगामाचे प्रथम दोन महिने फक्त कच्ची साखर उत्पादन करण्याचे धोरण ठेवावे व वरील अनुदान दुप्पट म्हणजेच रू. ११ प्रती क्विंटल करावे.

६२

साखरेची आंतरराष्ट्रीय दरातील तफावत लक्षात घेवून व निर्यातीस प्रोत्साहन देण्याकरीता राज्य शासनाने प्रती टन १००० रू. वाहतूक अनुदान दयावे. केंद्र सरकारकडील मिळणाऱ्या अनुदानास विलंब लागत असल्याने बीआरसीची वाट न पाहता कारखान्यांच्या बँकेतील खात्यामध्ये ऑनलाईन जमा करावे. साखर निर्यातीचे दिर्घकालीन धोरण स्विकारावे.

**७) ऊस पिकास ठिबक सिंचन योजना :–**

राज्यातील ठिबक सिंचन योजनेकरीता व्याजामधील सवलतीमुळे ही योजना शेतकरी वर्गामध्ये उत्सुकता नाही. यास्तव गुजरात राज्याचे ठिबक धोरण (८० ते १०० टक्के अनुदान) स्विकारल्यास ऊस उत्पादकांकडून त्याचे निश्चित स्वागत होईल.

**८) सेफासु लोन २०१४ व सॉफ्ट लोन २०१५ बाबत :–**

या दोन्ही योजना ऊस देयके देण्याकरीता कार्यान्वित करण्यात आल्या. या दोन्ही योजनांची परतफेड सप्टेंबर २०१६ पासुन चालू आहे. हंगाम २०१७–१८ च्या मंत्री समिती बैठक दिनांक २०/९/२०१७ चे इतिवृत्त मुद्दा कं. ७ भाग ८ नुसार राज्य शासनाने केंद्राकडे या दोंन्ही योजनांच्या पुर्नरचना करण्याबाबत शिफारस केली होती. त्याची त्वरीत अंमलबजावणी बाबत मा. मुख्यमंत्री महोदयांनी केंद्र सरकारकडे आग्रह धरावा अशी विनंती आहे.

साखर उद्योगाच्या नाजुक आर्थिक परिस्थितीमुळे वरील दोन्ही योजनांचे पुर्नगठण करून पाच वर्षांकरीता मुदतवाढ दयावी व या योजनेतील राज्य शासनाच्या व्याजाची सवलत खाजगी कारखान्यांना सुध्दा मिळावी. **तसा शासकीय आदेश असताना देखिल खाजगी कारखान्यांना या सवलती पासून वंचित ठेवण्यात आले आहे. तरी राज्य शासनाने याची गंभीर दखल घेवून खाजगी साखर कारखान्यांवरील अन्याय दूर करावा.**

**९) टप्पेनिहाय ऊस वाहतूक आकारण्याच्या निर्णयाबाबत :–**

राज्य सरकारने १८/३/२०१७ च्या परिपत्रकानुसार टप्पेनिहाय वाहतूक दर अदा करणेबाबत आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे सर्व ऊस पूरवठादार शेतकऱ्यांना समान ऊस दर देणे शक्य होणार नाही. माननीय उच्च न्यायालय औरंगाबाद खंड पिठाच्या निर्णयानुसार सर्व ऊस उत्पादक सभासद व ऊस पूरवठादार शेतकऱ्यांना एकसारखा दर देणे बंधनकारक आहे. तरी वरील परिपत्रक त्वरीत रद्द करावे.

१०) विना परवाना व विहीत मूदतीपूर्वी ऊस गाळप केल्यास रू. ५०० प्र.मे.ट. दंड आकारणीबाबत :—

राज्यामध्ये हंगाम २०१७—१८ ऊस मोठया प्रमाणावर उपलब्ध होता व तो परवान्या अभावी गाळप झाला नसता तर शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले असते. परवान्याकरीता माननीय साखर आयुक्तांकडे अर्ज करून काही तांत्रिक कारणामुळे विलंब झाल्यामुळे काही कारखान्यांनी परवाना मिळेल असे गृहीत धरून ऊसाचे गाळप केले होते. यास्तव व त्याआधिचे दोन हंगाम २०१५—१६, २०१६—१७ व चालू हंगाम २०१७—१८ मधील ज्या कारखान्यांनी विना परवाना गाळप केले आहे त्यांना ५० रू. प्रती टनाप्रमाणे दंडाची आकारणी करणे योग्य राहिल.

**जादा विषय —१) ऊस तोडणी यंत्राकरीता हंगाम २०१८—१९ मध्ये आर्थिक तरतूद करून अनुदान मिळणेबाबत.**

साखर हंगाम २०१७—१८ मध्ये अपेक्षेपेक्षा मोठया प्रमाणात ऊसाचे गाळप करावे लागले. सदर हंगामामध्ये तोडणी व ऊस वाहतूक कामगारांचा मोठया प्रमाणावर तुटवडा आगावू रकमा देवूनसुध्दा जाणवला व त्याचा शेतकऱ्यांना व कारखान्यांना आर्थिक फटका बसला. येणाऱ्या २०१८—१९ मधील हंगामाकरीता मोठया प्रमाणावर ऊस उपलब्ध असुन तोडणीस्तव यांत्रिक पध्दतीने नियोजन करावे लागेल. राज्यस्तरावरील कृषी विभागाच्या प्रकल्प छाननी समितीने केंद्र सरकारच्या नवीन RKVY-RAFTAAAR च्या मार्गदर्शक सुचनेनुसार राष्ट्रीय कृषी विभाग योजने अंतर्गत आर्थिक वर्ष २०१८—१९ मध्ये आलेल्या सर्व ऊस तोडणी यंत्राच्या अनुदानाचे प्रस्ताव स्विकारले नाहीत. यामुळे राज्यातील ऊस तोडणी कार्यक्रमामध्ये शेतकरी व कारखान्यांना मोठी अडचण निर्माण होणार आहे.

यास्तव राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पूर्वीप्रमाणेच ऊस तोडणी यंत्रांना अनुदान मिळणेबाबत राज्याने केंद्र सरकारकडे शिफारस करावी.

**जादा विषय —२) बफर स्टॉकवरील कर्जे —**

भारत सरकारच्या बफर स्टॉक योजनेअंतर्गत ठेवलेल्या साखरेच्या साठयावर १०० टक्के वित्तीय पूरवठा करणेबाबत केंद्र शासनाने आदेश देण्याबाबत राज्याने शिफारस करावी.

**जादा विषय –३) साखर निर्यात फरक रक्कम –**

राज्य बँकेने साखर निर्यातीकरीता भाव व मूल्यांकन यांच्या दर फरकाची रक्कम कारखान्याच्या हमी पत्रावर घेवून साखर खूली करावी याबाबत राज्य सरकारने बँकेस निर्देशित करावे.

वरील प्रमाणे सर्व मुद्देनिहाय आमचे म्हणणे येत्या मा. मंत्री समितीच्या बैठकीकडे खाजगी साखर कारखान्यांचे माध्यमातून मांडुन ते मान्य करण्याची आपण शिफारस करावी ही आग्रहाची विनंती.

कळावे,

आपले विनित,
वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन (एन.जी.ओ.) करीता,

रोहित पवार
उपाध्यक्ष

कृषीरत्न बी. बी. ठोंबरे
अध्यक्ष

[redacted]

पांडूरंग राऊत
महासचिव

अजित चौगुले
कार्यकारी संचालक

# महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लिमिटेड
## Maharashtra State Co-op. Sugar Factories Federation Ltd.
(Registered under Sec. 10 of Bombay Co-op. Societies Act. 1925)
"SAKHAR BHAVAN", 11th Floor, 230, Nariman Point, Mumbai - 400 021.


संक्र. एफ/442/ 2018–19 दि.18.09.2018

प्रति,
मा.नामदार श्री सुभाषजी देशमुख साहेब,
मंत्री,सहकार,पणन व वस्त्रोद्योग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई 400 032.

**विषय : महाराष्ट्र राज्यातील साखर उद्योगास उत्तर प्रदेशच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत.**

महोदय,

देशातील मागील दोन वर्षाचा ऊस व साखर उत्पादनाचा आढावा घेतला असता. हंगाम 2016–17 मध्ये साखरेचे उत्पादन 203 लाख टन झाले तर 2017–18 मध्ये मोठया प्रमाणात वाढ होवून 320 लाख टनावर गेले म्हणजेच एकाच वर्षात 117 लाख टनाने साखर उत्पादनात प्रचंड वाढ झाली. महाराष्ट्र राज्यात 2016–17 हंगामात 42.25 टन तर दुसऱ्याच वर्षी हंगाम 2017–18 मध्ये 107 लाख टन म्हणजेच अडीचपट साखर उत्पादन झाले. येत्या गळीत हंगामात देशांतर्गत 355 लाख टनाचा अंदाज असून तो जगातील आत्तापर्यन्त सर्वाधिक साखर उत्पादन करणाऱ्या ब्राझील देशालाही मागे टाकून साखर उत्पादनाचा जागतिक विक्रम होवू शकेल. यामध्ये महाराष्ट्र सुध्दा आघाडीवर राहणार असून महाराष्ट्राचे उत्पादन विक्रमी 110 लाख टनापर्यन्त होण्याचा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर व बाजारपेठेमध्ये उत्पादन खर्चापेक्षा साखरेला कमी किंमत मिळत असल्यामुळे साखर संघ आपले खालील महत्वांच्या मुद्यांकडे लक्ष वेधित आहे.

- **हंगाम 2018–19 चा साखर उत्पादनाचा ताळेबंद :**

| | | |
|---|---|---|
| साखर हंगाम 2018–19 साठीचा सुरुवातीचा साठा | – | 100 लाख टन |
| साखर हंगाम 2018–19 मधील अपेक्षित साखर उत्पादन | – | 355 लाख टन |
| **एकूण उपलब्ध साखर** | – | **455 लाख टन** |
| वजा देशांतर्गत साखरेचा वापर | – | 265 लाख टन |
| **निव्वळ शिल्लक साखर** | – | **160 लाख टन** |
| पुढील हंगामाकरीता कॅरीओव्हर स्टॉक | – | 90 लाख टन |
| अतिरिक्त होणारी पांढरी साखर | – | **100 लाख टन** |

प्रधान सचिव (सहकार) यांचे कार्यालय
क्रमांक : 533
दिनांक : 19/9/18
संबंधीत अधिकारी :


Telephones : 2204 2676 / 2901 / 4068 6900 • Fax : 022 - 2204 2578 / 4068 6998 • Telegram : "SAKARSANGH" Mumbai
E-mail : mahasugarfed@gmail.com • mahasugarfed@gmail.com • Website : www.mahasugarfed.org

<u>वरील वस्तुस्थिती पाहता खालील उपाययोजना करणे आवश्यक आहे.</u>

1. कच्च्या साखरेचे उत्पादन – गेल्या 3 वर्षापासून जागतिक बाजारपेठेमध्ये पांढऱ्या व कच्च्या साखरेचे दर सातत्याने घसरत आहेत. सध्या ते निच्चांकी पातळीवर 10 सेंटच्या खाली आले आहेत. जागतिक बाजारात पांढऱ्या साखरेला मागणी नगण्य असून ती विकली जात नाही. त्या मानाने कच्च्या साखरेला आशियाई देशांमध्ये चांगली मागणी असून ती ब्राझीलमधून आयात केली जाते. ब्राझील आणि भारत या दोन्ही देशांचे आशियाई देशांशी असणारे अंतर पाहता भारताचे अंतर कमी असल्यामुळे भारताची साखर या सर्व देशांना स्वस्त पडते.
   यास्तव महाराष्ट्र राज्यातील सर्व साखर कारखान्यांना येत्या गळीत हंगाम 2018–19 मध्ये प्रथम दोन महिने कच्च्या साखरेचे उत्पादन करण्यास अनिवार्य करावे.

2. कच्च्या साखरेची निर्यात आर्थिकदृष्ट्या परवडण्यास्तव उत्पादन अनुदान ऊस गाळपाच्या प्रती टनास रु.100 द्यावे.

3. राज्यातील बंदरांमधून कच्ची व पांढरी साखर निर्यातीस्तव प्रती टन रु.2500 वाहतुक अनुदान द्यावे.

4. सॉफ्ट लोन – 2015 चे परतफेडीचे हप्ते चालू झाले आहेत. कारखान्यांच्या आर्थिक अडचणींमुळे गेल्या दीड वर्षापासून वरील हप्ते थकीत आहेत. राज्य शासनाकडून मिळणारे व्याज त्वरीत अदा करावे.

5. हंगाम 2018–19 मध्ये उसाची अतिरिक्त उपलब्धता असल्यामुळे कारखान्यांना 10 टक्के मार्जिन ठेवून खेळते भांडवल पुरविणेस्तव बँकांना आदेश व्हावेत.

6. हंगाम 2018–19 मध्ये केंद्र सरकारने एफआरपी मध्ये रु.200 ने वाढ केली आहे व उत्पादनामधील इतर खर्चामध्ये वाढ झाल्यामुळे भारत सरकारने साखरेची न्युनतम विक्री किंमत रु.29.00 वरुन रु.35.00 प्रति किलो करावी अशी राज्याने केंद्रास आग्रही शिफारस करावी.

7. ऊस तोडणी मजूरांची कमतरता, तोडणी खर्च व अतिरिक्त उसाची उपलब्धता या कारणास्तव ऊस तोडणी यंत्राचा वापर अनिवार्य ठरणार असून पूर्वीप्रमाणेच रु. 40.00 लाख प्रति यंत्र असे अनुदान 200 यंत्राकरीता देण्यात यावे.

# महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लिमिटेड



आपण व मा. मुख्यमंत्री महोदय यांनी साखर उद्योगाच्या वरील ज्वलंत प्रश्नाबाबत मार्ग काढून या ग्रामीण उद्योगास जीवदान द्यावे अशी विनंती आहे.

मा.श्री. जयप्रकाश दांडेगांवकर, उपाध्यक्ष यांच्या मान्यतेने सादर

कळावे,

आपला विश्वासू,

संजय खताळ
व्यवस्थापकीय संचालक

प्रत : 1) मा.प्रधान सचिव (सहकार),
सहकार विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय,
मुंबई.

2) मा.साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,साखर आयुक्तालय
साखर संकुल,शिवाजीनगर,पुणे411 005.

3) मा.अध्यक्ष,
विस्मा, पुणे.